# विद्यार्थ्यांनी कार्यक्षेत्रात स्वत:ला सिद्ध करावे

## खा. प्रताप पाटील चिखलीकर यांचे मत; राजगुरुनगरला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर बदलत्या शैक्षणिक पद्धतींचा विचार करून निवडलेल्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी स्वत:ला सिद्ध करावे, असे आवाहन नांदेडचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी महाराष्ट्र केसरी विजेते शिवराज राक्षे, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, अ‍ॅड. राजमाला बुट्टे पाटील, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजाराम लोखंडे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.




**महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे यांचा सत्कार करताना अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, नानासाहेब टाकळकर आदी.**

**शिवराज राक्षेंचा सत्कार**

शिवराज राक्षे यांचा खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मानाची गदा व १ लाख १ हजार १११ रुपये देण्यात येऊन सत्कार करण्यात आला. खेड तालुका खरेदी-विक्री संघाच्या वतीनेही राक्षे यांना १ लाख रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

खा. चिखलीकर यांनी, मनवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणात गुणवत्तापूर्ण बदल होणार आहे. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून वाटचाल करावी,फ असे सांगितले. स्पर्धेच्या युगात खडतर परिश्रमाशिवाय यश नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी उद्याच्या आव्हानांना आत्मविश्वाने सामोरे जाताना समाजाच्या विविध क्षेत्रांत स्वत:चे अस्तित्व निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

राक्षे यांनी विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी मेहनतीची कठोर तपश्चर्या करावी, असे आवाहन केले.

खा. चिखलीकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मिलिंद गाढवे, सागर पिंगळे, शुभम मांजरे, धनंजय सातकर, ऋषिकेश बोऱ्हाडे यांचा संस्थेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

अहवालवाचन प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. डॉ. संजय शिंदे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, डॉ. योगेश वाळुंज यांनी संयोजन केले. उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Feb 7, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in